क्लायमेंट चेंज नॉलेज नेटवर्कची स्थापना करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१४/प्र.क्र.८/३-अे

मादाम कामा मार्ग, राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
तारीख: २० जानेवारी, २०१४

**वाचा -**

केंद्र शासनाचे पत्र क्र.११-५/२०१२-आर.एफ.एस-३, दिनांक १०.९.२०१३

**प्रस्तावना -**

१२ व्या पंचवार्षिक योजनेत केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालय व जर्मन इंटरनॅशनल कॉर्पोरेशन यांच्य सहकार्याने क्लायमेंट चेंज नॉलेज नेटवर्कची स्थापना करणे हा प्रकल्प महाराष्ट्र, झारखंड व ओरिसा राज्यात राबविण्यात येणार आहे. सदरचा प्रकल्प भारत सरकार व जर्मन सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने राबविला जाणार असून याप्रकल्पासाठी भारत सरकार व जर्मन सरकारचे अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. जर्मन सरकारची मदत ही जर्मन इंटरनॅशनल कॉर्पोरेशनव्दारे मिळणार आहे.

सदरचा प्रकल्प राबविण्यासाठी राज्यातील २ जिल्हयांची निवड करणे , समन्वय यंत्रणेची निवड करणे व राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी सुकाणू समितीची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय -**

हवामानातील बदलाचा शेती उत्पन्नावर मोठया प्रमाणवर परिणाम होत असल्याने या प्रकल्पांतर्गत याबाबतची माहिती कृषि विभागातील यंत्रणेमार्फत शेतक-यांपर्यंन्त पोहचविणे, त्यादृष्टीने कृषि तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे, राज्यस्तरीय कृषि व्यवस्थापन व तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्था, कृषि विज्ञान केंद्र यांचेमार्फत कृषि व संलग्न विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी चर्चासत्र व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावयाची आहेत.

या प्रकल्पांतर्गत राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर चर्चासत्र आयोजित करणे, कृषि विद्यापीठ, सामेती व कृषि विज्ञान केंद्र यांच्या मदतीने कृषि स्वयंसहाय्यता गट, महिला बचत गट, ग्रामीण तरुण शेतक-यांचे गट, कृषि मित्र, प्रगतशील शेतकरी यांचे जिल्हा/तालुकास्तरावर प्रशिक्षणवर्ग आयोजित करणे इ. कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

राज्यातील पुणे व अहमदनगर जिल्हयांची निवड हा प्रकल्प राबविण्यासाठी करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर कृषि संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे हे तर जिल्हास्तरावर प्रकल्प संचालक (आत्मा) हे समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) म्हणून काम पाहतील.

या संदर्भात हवामाना विषयक होणा-या बदला बाबतची माहिती संचालक (आत्मा) तथा समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) यांनी उ.स (का.क १०-अे) मार्फत मा. अपर मुख्य सचिव (कृषि)

यांना सादर करावी.

या प्रकल्पासाठी केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या खाजगी सल्लागारासाठी कृषि आयुक्तालयामध्ये आवश्यकतेनुसार जागा उपलब्ध करुन द्यावी.

राज्यात सदरचा प्रकल्प पहिल्या टप्प्यामध्ये पुणे व अहमदनगर या जिल्हयामध्ये राबविण्याचा असून दुस-या टप्प्यामध्ये प्राधान्याने औरंगाबाद व अमरावती जिल्हयामध्ये राबविण्यात यावा. केंद्र शासनाच्या सुचनेनुसार सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे सुकाणू समिती गठित करण्यात येत आहे.

**राज्यस्तरीय सुकाणू समिती:**

| | | |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव, कृषि व पणन | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव (ग्रामविकास विभाग) | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव (पर्यावरण विभाग) | सदस्य |
| ४. | कुलगूरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी | सदस्य |
| ५. | आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे | सदस्य |
| ६. | उपसचिव (आत्मा), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ७. | प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार | सदस्य |
| ८. | कृषि संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

**जिल्हास्तरीय सुकाणू समिती:**

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. | सदस्य |
| ३. | कृषि व संलग्न विभागाचे जिल्हास्तरीय विभागप्रमुख. | सदस्य |
| ४. | जिल्हयातील कृषि विद्यापीठाच्या संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक. | सदस्य |
| ५. | कृषि विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ६. | जिल्हयातील भारतीय कृषि अनुसंधारण संस्थेच्या संशोधन केंद्राचे प्रतिनिधी. | सदस्य |
| ७. | जिल्हयातील अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८. | प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार | सदस्य |
| ९. | प्रकल्प संचालक, आत्मा. | सदस्य सचिव |

या प्रकल्पासाठी केंद्र शासनामार्फत प्राप्त होणार निधी कृषि संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे मार्फत संबंधित जिल्हयाचे प्रकल्प संचालक (आत्मा) यांचे बँक खात्यात हस्तांतरित करण्यात यावा. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार या प्रकल्पासाठी प्राप्त होणा-या निधीसाठी स्वतंत्र लेखे राज्य व जिल्हास्तरावर ठेवणे आवश्यक आहे. या प्रकल्पासंदर्भात मार्गदर्शक सूचना आयुक्त (कृषि), पुणे यांच्या सहमतीने संचालक (आत्मा) यांनी निर्गमित करावयात

उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१२०१३१४५६३००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. प्रस्तुत शासन निर्णय मा.अ.मु.स (कृषि) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jadhav Shrirang V

Digitally signed by Jadhav Shrirang V
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agri & ADF, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Jadhav Shrirang V
Date: 2014.01.20 13:20:06 +05'30'

**श्रीरंग.वि.जाधव**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. मंत्री, (कृषि व पणन) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२. मा. राज्यमंत्री, (कृषि व पणन) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३. अपर मुख्य सचिव, कृषि व पणन, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४. प्रधान सचिव (ग्राम विकास विभाग), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
५. प्रधान सचिव (पर्यावरण विभाग) मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
६. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य पुणे-१
७. कृषि संचालक (आत्मा) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे-४११ ००१
८. कुलगूरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
९. उपसचिव (का.क्र.१०-ओ), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई ४०० ०३२
१०. उपसचिव (३-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई ४०० ०३२
११. जिल्हाधिकारी (पुणे / अहमदनगर)
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (पुणे / अहमदनगर)
१३. विभागीय कृषि सहसंचालक (पुणे)
१४. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे /अहमदनगर
१५. प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार,
१६. प्रकल्प संचालक (आत्मा), पुणे व अहमदनगर
१७. निवड नस्ती, ३-अे

------